महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-400 703.
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

क्र. मुंविमं/कें.नि./२०२६/ 3625
वाशी, नवी मुंबई ४००७०३
दिनांक 19 /०८/२०२६

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,

विषय:- फेब्रु - मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक / माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेपासून नवीन परीक्षा केंद्र सुरु करावयाचे असल्यास प्रस्ताव सादर करणेबाबत...

संदर्भ:- राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं/परीक्षा-८/३८६५ दि. २३.०७.२०१९

फेब्रु - मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी आपली शाळा /कनिष्ठ महाविद्यालयास नवीन परीक्षा केंद्र मिळण्यासाठी मंडळाच्या विहीत नमुन्यात प्रस्ताव दि. ३१/०८/२०२६ पर्यंत हस्तपोच सादर करावा. याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ज्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयास नवीन परीक्षा केंद्र सुरू करावयाचे आहे त्यांनी प्रथम प्रस्ताव फॉर्मची मंडळाकडे पत्राद्वारे मागणी करण्यात यावी व फॉर्म फी रू. १०००/- (रू. एक हजार फक्त) मंडळामध्ये भरून प्रस्ताव फॉर्म विकत घेण्यात यावा.

नवीन परीक्षा केंद्राचा प्रस्ताव सादर करणाऱ्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. परीक्षा केंद्राकरिता आवश्यक किमान विद्यार्थी संख्या निकष -

अ. क्र.	भाग शहरी / ग्रामीण	किमान विद्यार्थी संख्या	
		इ. १० वी	इ. १२ वी
०१	शहरी भाग	४००	५००
०२	ग्रामीण भाग	३००	४००

२. नवीन मान्यता मिळालेल्या शाळा कनिष्ठ महाविद्यालयास दोन वर्षापर्यंत परीक्षा केंद्र घेता येणार नाही.
३. परीक्षा केंद्रावर समाविष्ठ होणाऱ्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची संख्या कमीत कमी २ असावी व त्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालये एकाच संस्थेच्या नसाव्यात.
४. केंद्र व्यवस्थापनासाठी ०३ वर्गखोल्या आणि २५ विद्यार्थ्यांमागे ०१ वर्गखोली याप्रमाणात वर्गखोल्या असाव्यात. तसेच प्रत्येक परीक्षार्थ्यास एक याप्रमाणात ड्युएल डेस्क / बेंच (बसणे व लिहिणे) पुरेसे असणे आवश्यक आहे.
५. परीक्षा दालनात, परीक्षेशी संबंधित सर्व वर्गखोल्यांमध्ये, व परिसरात CCTV कॅमेरे कार्यरत असणे आवश्यक आहे. तसेच CCTV चे बॅकअप / स्टोरेज जतन करून ठेवणे आवश्यक आहे.
६. प्रस्तावित नवीन केंद्र शाळा / क. महाविद्यालयामध्ये जनरेटर व इतर सर्व भौतिक सोईसुविधा असणे आवश्यक आहे.
७. नवीन परीक्षा केंद्र प्रस्तावित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारती भोवती चारही बाजूंनी सुरक्षित कंपाउंड असावे.
८. केंद्र प्रस्तावासोबत ना परतावा छाननी शुल्क रु. १०,०००/- (रू. दहा हजार फक्त) मंडळ कार्यालयात जमा करावी व त्याची पावती प्रस्तावासोबत सादर करावी.

तसेच सोबत जोडलेल्या यादीनुसार सर्व कागदपत्रांची पूर्तता प्रस्तावासोबत करण्यात यावी. अपूर्ण प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर प्रस्ताव या कार्यालयास विनाविलंब दि. ३१/०८/२०२६ पर्यंत हस्तपोच पाठवावेत. तरी नवीन केंद्र निर्मितीचा प्रस्ताव विहीत दिनांकापर्यंत सादर करावा म्हणजे पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल याची कृपया नोंद घ्यावी. मुदतीनंतर येणारा प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३.

प्रत माहीतीस्तव:-
शिक्षणाधिकारी (माध्य.) ठाणे / रायगड / पालघर व शिक्षण निरिक्षक मुंबई दक्षिण / पश्चिम / उत्तर.

नवीन परीक्षा केंद्राचे प्रस्ताव सादर करताना प्रकरणिकेला खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत

अ. क्र.	कागदपत्रांचा तपशील	पृष्ठ क्र.
१	केंद्राची मागणी करणाऱ्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे कव्हरींग पत्र	
२	शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक यांचे शिफारस पत्र	
३	गट शिक्षणाधिकारी यांचे पडताळणी केल्याबाबतचे अभिप्राय	
४	नवीन परीक्षा केंद्र छाननी शुल्क रू. १०,०००/- (ना परतावा) भरणा केलेची पावती	
५	नवीन केंद्र प्रस्ताव अर्ज मुळप्रत ११ पानी पूर्ण भरलेला स्टॅम्प सही सह	
६	प्रस्तावित नवीन परीक्षा केंद्रास जोडावयाच्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची नावे व विद्यार्थी संख्यांचा तक्ता	
७	नवीन केंद्र मागणी करणाऱ्या शाळा / क.म.चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र	
८	नवीन केंद्रास जोडावयाच्या शाळा/क.म.चे स्टॅम्प पेपरवर वेगवेगळे हमीपत्र	
९	सर्व जोडावयाच्या शाळा / क. महाविद्यालयाचे लेटरहेडवर संमती पत्र Index no. सह	
१०	शाळा / क. महाविद्यालयाला मंडळ मान्यता मिळालेले पत्राची झेरॉक्स प्रत	
११	पालक/शिक्षक/व्यवस्थापन समितीची नवीन केंद्र मागणीबाबतचा ठराव	
१२	शाळेच्या / कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीचा समोरून पूर्ण फोटो	
१३	शाळेच्या / कनिष्ठ महाविद्यालयाच्या चारी बाजूचे कंपाऊंडचे स्पष्ट फोटो	
१४	शाळेतील/क.म.मधील जनरेटर /इन्व्हर्टरचे फोटो व स्टॉक रजिस्टरला नोंदीची प्रत	
१५	परीक्षा दालनात, परीक्षेशी संबंधित सर्व वर्गखोल्यांमध्ये, व परिसरात CCTV कॅमेरे कार्यरत असल्याचे फोटो	
१६	वर्गखोल्याचे/बॅचेसचे/स्वच्छता गृह/पिण्याचे पाणी व्यवस्था/आग प्रतिबंधक यंत्रणेचे फोटो	
१७	तालूक्याचा नकाशा (गुगलवरील मॅप)	
१८	प्रस्तावित केंद्र शाळा/क. महाविद्यालय व जोडावयाच्या शाळा/क. महाविद्यालय यांचा दिशा दर्शक व अंतर दर्शविणारे नकाशा व मूळ केंद्राचे अंतराबाबतचे नकाशे	
१९	मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची यादी	
२०	प्रस्तावित केंद्र शाळा / क.महावद्यालय व जोडावयाच्या शाळा / क.महाविद्यालया मधील विद्यार्थी यादी.	
२१	मागील वर्षाचे जूने केंद्रावर विद्यार्थी संख्येवर परिणाम होत नसल्याबाबतचे नाहरकत पत्र	